# खुनातील फरार आरोपीस स्थागुशाने केली अटक

नांदेड (प्रतिनिधी) - शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ ऑक्टोबर रोजी सिद्धांत जोंधळे याचा खून झाला होता. या प्रकरणातील अजय ऊर्फ बंटी लोणे, रवी हाडसे, अतिष सुरेष चव्हाण हे आरोपी फरार होते. या खुन प्रकरणातील फरार आरोपींना स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला अटक करण्यात यश आले आहे.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ ऑक्टोबर रोजी सिद्धांत दौलत जोंधळे यास अजय ऊर्फ बंटी लोणे, रवी हाडसे, अतिष सुरेष चव्हाण यांनी चाकुने भोसकून खून केला होता. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील तीनही आरोपी फरार होते.दरम्यान स्थागुशाच्या पथकला अजय लोणे व रवी हाडसे विद्यापीठ परिसरात असल्याची माहिती मिळाली. स्थागुशाच्या पथकाला पाठवून या दोघांना ताब्यात घेण्यात आले. या आरोपींना पुढील तपासासाठी भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. तसेच यांचा तिसरा साथीदार परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे असल्याची माहिती मिळाली. यावरुन स्थागुशाच्या पथकाला पाठवून अतिष सुरेश चव्हाण याला १४ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेण्यात आले. या आरोपीलाही भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, **(शेवटच्या पानावर)**

## खुनातील फरार आरोपीस...

(पान १ वरून) अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पी.एम. राठोड, पोलीस नायक बालाजी तेलंग, जमादार देवा चव्हाण,रवि बाबर,विठल शेळके, विलास कदम,गणेश धुमाळ, शेख कलीम,चालक हेमंत बिचकेवार यांनी पार पाडली आहे.